• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८९ • शुक्रवार,दि.१९ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 289 • Friday 19 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज |बीड |परभणी |छत्रपती संभाजीनगर |जालना |लातूर |धाराशिव |हिंगोली |नांदेड |नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# कृषीमंत्री मुंडेंची करूणा शर्मा यांना जिवे मारण्याची धमकी

## मंत्रीपदावरून हकालपट्टी करा– करूणा शर्मा



**मुंबई । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादीचे नेते आणि सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या कथित पत्नी करूणा शर्मा मुंडे यांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहे. ' मुंडे यांच्या दबावामुळेच माझा आईने आत्महत्या केली. मुंडे यांची पहिली बायको असून त्याचे माझाकडे पुरावे आहे. त्यांनीच माझ्या आईची हत्या केली आहे, असा गंभीर आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे. करुणा शर्मा यांनी पत्रकार परिषद घेऊन धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. या पत्रकार परिषदेत मुलगी शिवानी मुंडे मोठा गौप्यस्फोट करणार होती. पण ऐनवेळी मुलगी पत्रकार परिषदेस गैरहजर राहिली. 'धनंजय यांच्या सांगण्यावरून मी बहिणीला घराबाहेर काढले. मी मंत्री महोदय यांच्यावर विश्वास ठेवला. मात्र मंत्री महोदय यांनीच माझा बहिणीच्या मोबाइलवर मेसेज केले. यानंतर मी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मंत्री मुंडे याच्या दबावामुळे आमच्यावर गुन्हे दाखल करत अटकेची कारवाई केली. मी मुंडे यांची पहिली बायको असून त्याचे माझाकडे पुरावे आहे. मी आजपर्यंत माझं तोंड उघडलं नाही. मी आजपर्यंत त्यांची इज्जत करत होती, मुंडे यांच्या दबावामुळेच माझा आईने आत्महत्या केली. २००८ पासून मुंडेंवर विश्वास ठेवून बहिणींशी बोलत नाही. माझा आईची मुंडेंनी हत्या केली, असा गंभीर आरोप करुणा मुंडे यांनी केला. मुंडेंनी मंत्रिपदाचा गैरवापर केला. शरद पवारांनी मुंडेंना मंत्रिपदावरून हकलं पाहिजे. माझापासून दोन मुलांना जन्म देऊन आम्हाला रस्त्यावर सोडलं. मी माझा बहिणीला जेल मध्ये भेटायला गेले. धनंजय मुंडे यांचे अन्य महिलांशीही अनैतिक संबध आहेत याचे पुरावे माझाकडे आहेत, असा आरोपही करुणा शर्मा यांनी केला. छत्रपतीच्या नावाने राजकारण करणारे आज का नाही बोलत. सुप्रिया ताई यांच्याकडे न्यायासाठी अनेकदा विनंती केली मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. माझी एकच मागणी आहे त्यांच्याकडे मुंडे यांना मंत्रिपदावरून हकलावे. मुंडे यांनी इतर महिलांनाही दबाव टाकून गप्प केले आहेत. धनंजय मुंडे यांच्यावर माझा बहिणीने केलेले आरोप लवकरच माझी बहिण त्याचे पुरावे देईल, असंही करुणा शर्मा म्हणाल्या. मुंडेंवरील बलात्काराचा गुन्हा लवकरच उचलून धरणार आहे, माझा बहिणीला मुली प्रमाणे सांभाळण्याची ग्वाही देत होते मात्र, मुलीसोबत असे गैरकृत्य केले. मी सीबीआयकडे ही चौकशीची मागणी केली आहे. मुंडे १० नंबरहून का बोलतात एका वेश्याचेही दहा नंबर नसतात मग मुंडे नेमके बोलतात कुणाशी? मी धनंजय मुंडेंविरोधात दिलेल्या तक्रारीबाबत कुठलीच कारवाई होत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस मुंडे याना पाठीशी घालत आहे, असा आरोपही त्यांनी केला. मी पवारसाहेबांची आतापर्यंत इज्जत करत होती मात्र या प्रकरणात अशा लोकांना ते पाठीशी घालत आहे. हे पाहून वाईट वाटत आहे. माझी मुलगी ही परिषद घेणार होती मात्र तिला धमकी येत असल्यामुळे ती आली नाही, असा आरोपही त्यांनी केला. 'मुंडे मंत्रिपदाचा गैरवापर पुरेपुर करत आहे. जर त्यांनी काही केलं नव्हतं मग मुंडे यांनी पैसे दिलेच का? काय कारण

पुढील पानावर

# सरकारला भ्रमात ठेवणार अन् मुंबई गाठणार




**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलनासाठी जाणारच असून, सर्व तयारी झाली आहे. सरकार आम्हाला धोका देत आहे, त्यामुळे आम्ही खूप सावध झालो आहेत. तसेच, सरकारला भ्रमात ठेवणार अन् गनिमी कावाने मुंबई गाठणार आहोत. अचानक लाखो लोकं येतील आणि तुम्ही देखील पाहत राहताल असे मनोज जरांगे म्हणाले आहेत. आंतरवाली सराटीमध्ये पत्रकार परिषेदत ते बोलत होते. दरम्यान यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, गोडीने गुलाबीने तोडगा काढा, हे आंदोलन बंद पडणार नाही. शिष्टमंडळ आणि दुरुस्ती एवढंच मला पाठ झालय. त्यांच्याकडून त्रुटीच निघेना आणि उगच हिंडत आहेत. मी मॅनेज होत नाही हे तुमचं (सरकार) दुखणे आहे. पूर्वीचा मराठा राहिला नाही, आता देशव्यापी आंदोलनाची मागणी आहे. शिष्टमंडळाचा देखील आता कंटाळा आलाय, असे जरांगे म्हणाले. ५४ लाख नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र दिल्या शिवाय माघार नाही. २० ला मुंबईला जाणारच, आरक्षण दिले तर गुलाल घेऊन जाऊ आणि नाही दिले तर आरक्षणासाठी जाणार आहोत. मी प्रामाणिक आणि संयमाने आंदोलन चालू ठेवले आहे. समाजाने ७ महिने वेळ दिला आहे. आता २० जानेवारी आमच्या तयारीसाठी वेळ होता, पण त्यांच्यासाठी देखील हा वेळच होता. त्यामुळे आता मराठे काय असतात ते २६ जानेवारीला बघा असा इशारा देखील जरांगे यांनी दिला आहे. सरकार आम्हाला धोका देत आहे, पण सरकारला आम्ही भ्रमात ठेवणार आहे. आम्ही खूप सावध आहोत. आम्ही आता गनिमी कावाने मुंबईला पोहचवून

पुढील पानावर

# पत्रकारच समाजाचा योग्य दिशा दाखवतात –आमदार संदीपभैय्या





**माजलगाव । प्रतिनिधी**

सध्याचे राजकीय वातावरण पाहता लोकशाही जीवंत ठेवण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने पत्रकारांवरच आली आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक राही भिडे यांनी केले. त्या माजलगाव येथे गुरूवार दि १८ जानेवारी रोजी मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर,प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार,राजकीय विश्लेषक भिडे,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,माजी आमदार सलीम,माजी आमदार होके पाटील,माजी आमदार मोहनराव सोळंके, आ.सोळंके , रमेश आडसकर,लोकपत्रकार तावरे आदींनी उपस्थिती होती. प्रारंभी प्रास्ताविक माजलगाव एकता पत्रकार संघाचे पत्रकार पठाण यांनी केले. पुढे बोलताना राही भिडे म्हणाल्या, सध्याची राजकीय परिस्थिती विदारक असून लोकशाही धोक्यात आलेली असताना ती वाचवण्यासाठी आता पत्रकारांवर खरी जबाबदारी आली आहे. अध्यक्षीय भाषणात आमदार संदीपभैय्या म्हणाले, पत्रकारिता हा व्यवसाय नसून ते व्रत आहे.पत्रकारच समाजाचा खरा आरसा आहे. लोकप्रबोधना बरोबरच राजकरण्यांना योग्य दिशा देण्याचे कामही पत्रकार करत असतात. माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात दि १८ जानेवारी गुरुवार रोजी हा मुकनायक व माजलगाव भूषण सन्मान सोहळा थाटात रंगला. मान्यवरांच्या हस्ते मूकनायक सन्मान आरोग्यदूतचे संपादक देशमाने,दै. मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना प्रदान करण्यात आला. आहे.तसेच सन्मान भुमीपुत्रांचा यामध्ये अहमदनगर येथील महानगरपालिकाचे आयुक्त डॉ.जावळे, यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्याचे तहसीलदार डॉ.शिवाजी मगर व सां.बा.उपविभाग परळी येथील साहाय्यक अभियंता श्रेणी –२ दिपाली रामदास गिते तर माजलगाव भूषण पुरस्कार कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीनराव नाईकनवरे, ड. भानुदास डक, कानडे, रांजवण,डॉ. आगे,सरपंच सौ.

पुढील पानावर

# नागपूरच्या रणांगणात नितीन गडकरींसमोर तुल्यबळ उमेदवार कोण?



**नागपूर । वृत्तसंस्था**

लोकसभा मतदार संघ विदर्भातील प्रमुख मतदारसंघापैकी महत्वाचा मतदारसंघ आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आणि दीक्षाभूमी असे दोन प्रमुख वैचारिक केंद्र असलेला हा मतदारसंघ परंपरागतरित्या काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असे. मात्र २०१४ नंतर देशात झालेले राजकीय परिवर्तन व नागपूरला गडकरींसारखा दिग्गज नेता मिळाल्यानंतर नागपूरकर मतदारांनी भाजपला भक्कम साथ दिली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत नितीन गडकरी यांनी काँग्रेसचे उमेदवार नाना पटोले यांचा तब्बल २,१६,००९ मतांनी पराभव केला होता. २०१४ च्या तुलनेत गेल्या निवडणुकीत त्यांचे मताधिक्य काहीसे घटले होते. नागपूर लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा मतदारसंघ येतात. यातील नागपूर पूर्व, नागपूर दक्षिण, नागपूर दक्षिण–पश्चिम, व नागपूर मध्य या चार मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत. नागपूर पश्चिम व नागपूर उत्तर या दोन मतदारसंघात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे आमदार निवडून आले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर दक्षिण–पश्चिम विधानसभा मतदार संघातून प्रतिनिधित्व करतात. नागपूर शहरात भाजपचा वरचष्मा पहायला मिळतो. सद्यस्थितीत नागपूर महानगरपालिकेवर प्रशासन राज आहे. मात्र गेल्या १५ वर्षापासून महानगरपालिकेवर भाजपची एकहाती सत्ता असल्याने गल्लीपासून दिल्लीपर्यंत नागपुरात कमळ उमलल्याचे दिसते. नागपुरात सर्वच निवडणुकांमध्ये कायमच भाजप विरुद्ध काँग्रेस अशी दुहेरी लढत पहायला मिळते. अन्य पक्षांना नागपुरच्या राजकारणात तेवढे स्थान नाही, त्यामुळे त्यांचे अस्तित्व इथे पहायला मिळत नाही. शिवसेना व राष्ट्रवादीत फूट झाल्यानंतर आधीच नगण्य असलेली या दोन्ही पक्षाची ताकत नागपुरात अधिक विभागल्या गेली आहे. या उलट नागपुरात आंबेडकरी विचारांचा वारसा जोपासणारे मतदार

पुढील पानावर

संपादकीय

# राजकारणाचा न्याय!



पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला 'न भूतो न भविष्यति' बहुमत मिळाले. मनात भय उत्पन्न व्हावे, असे ते बहुमत होते. ते सुरक्षित ठेवण्यासाठी राजीव गांधी सत्तेत आल्यानंतर महिन्याभरात पक्षांतरबंदी कायदा झाला. १५ फेब्रुवारी १९८५ रोजी राष्ट्रपतींनी मान्यतेची मोहोर उमटविली. राज्यघटनेच्या दहाव्या सूचीत या कायद्याचा समावेश झाला. हा कायदा झाल्यापासून चार दशकांमध्ये पक्षांतरे थांबलेली नाहीत. सरकारे पडणे संपले नाही. सभागृहांमधील गटोपगटांची निर्मितीही गोठली नाही. थोडक्यात, या कायद्याचे राजकीय संस्कृती निवळशंख करण्याचे उद्दिष्ट बिलकुल साधलेले नाही. उलट, या कायद्यातील पळवाटा, चोरवाटा शोधण्याची अहमहमिका सुरू झाली. कज्जेदलालीने कळस गाठला. हे सारे लोकांचे राजकारण नसून कुरघोडीचे कायदेकारण असते. महाराष्ट्रात तेच चालू आहे. कुठेही 'जनतेचे न्यायालय' असे फलक लावून निकालांचा आपल्याला हवा तो अर्थ श्रोत्यांना सांगता येतो. मात्र, मतपेटी हेच जनतेचे एकमेव न्यायालय असते. विधानसभेच्या अध्यक्षांच्या निकालांना आव्हान देण्याची जागा न्यायालय ही असते. शिवसेनेने तसे ते सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. दुसरीकडे, ठाकरे गटाच्या आमदारांना अध्यक्षांनी अपात्र का ठरविले नाही, अशी तक्रार करणारी याचिका शिंदे गटाने उच्च न्यायालयात केली आहे. असे असताना एका बाजूने व्यासपीठावर वकिलांना आणून विधानसभा अध्यक्षांच्या निकालाची चिरफाड करणे आणि दुसरीकडे, अध्यक्षांनी लगोलग आपल्या निकालाचे समर्थन करून, त्याची घटनात्मक वैधता अधोरेखित करणे, या दोन्ही बाबी न्यायासनासमोरील सुनावणी खेचून बाहेर जनतेत आणणे आहे. न्यायालयीन प्रक्रियेचे पावित्र्य आणि गांभीर्य उणावणारा हा घटनाक्रम आहे. शिवसेनेची रीतसर घटना होती का, तिच्यात सुधारणा कधी झाली, निवडणूक आयोगाला सादर केलेल्या पत्रामध्ये घटनादुरुस्तीचा उल्लेख होता का, पक्षात रीतसर पक्षांतर्गत निवडणूक झाली का, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधीन राहून अध्यक्षांनी काम केले का, शिवसेनेची २०१२ मधील घटनादुरुस्ती वैध की अवैध, यातील काही प्रश्नांची तीन व्यासपीठांवर छाननी झाली किंवा पुढेही होईल. पहिले व्यासपीठ विधानसभा अध्यक्षांचे. दुसरे निवडणूक आयोगाचे आणि तिसरे न्यायालयाचे. एकाच घटनेचा तीन ठिकाणी लागणारा अन्वय सारखा नसणारच. त्यामुळे, उद्धव ठाकरे यांच्या महा-पत्रकार परिषदेनंतर विधानसभेचे अध्यक्ष यांनी दिलेले उत्तरही अनेक प्रश्न उपस्थित करणारे होते. पक्षांतरबंदी आणि त्यातून जन्माला येणारे विवाद सभागृहांच्या अध्यक्षांकडे निकालासाठी जावेत का, हा मूळ प्रश्न फार नाजूक आहे. हे सगळे अधिकार उद्या केवळ न्यायालयांकडे गेले तर संसदीय लोकशाहीतील अध्यक्षांच्या न्यायिक स्थानाला धक्का लागेल. तसे होणे उचित नाही. दुसरीकडे, कोणत्या सभागृहांचे अध्यक्ष हे पक्षपाती वागतात आणि कोणते अध्यक्ष निष्पक्ष निकाल देतात, हे ठरविण्याचा अधिकार कोणाचा? एखाद्या कज्जेदलालीत राजकीय पक्षच पक्षकार असेल तर त्याला असा ठपका ठेवण्याचा नैतिक अधिकार नाही. तो जास्तीत जास्त उपलब्ध कायदेशीर पर्याय वापरून वरच्या न्यायासनाकडे दाद मागू शकतो. शिवसेनेचे दोन्ही गट न्यायालयात गेले आहेत, हे त्या दृष्टीने योग्य झाले. लोकसभेची निवडणूक जवळ येते आहे. नंतर विधानसभेची निवडणूक येईल. दरम्यान उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमधील याचिकांची सुनावणी वेगवेगळी होणार की सर्वोच्च न्यायालय शिंदे गटाची याचिका मुंबईतून वर्ग करून एकत्रित सुनावणी करणार, हा प्रश्न आहे. ती सुनावणी किती वेळेत संपून निकाल कधी लागणार आणि त्या निकालाची तामिली सध्याच्या सभागृहाची मुदत संपण्याच्या आत होणार की नाही, हे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत. महाराष्ट्रातील प्रत्यक्ष सत्तेच्या राजकारणावर तीनही व्यासपीठांवर झालेल्या किंवा होणाऱ्या न्यायप्रक्रियेचा थेट परिणाम होतो आहे का, हा यातला कळीचा प्रश्न आहे. तसा तो होत नसेल तर या साऱ्या प्रक्रियेतील प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने असणारी व्यर्थता नजरेआड करण्याजोगी नाही. आधी भाजपशी असणारी निवडणूकपूर्व युती तोडून उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत गेले. मग एकनाथ शिंदे यांनी बंड करून ते सरकार पाडले. पुढे अजित पवार यांनीही जुना फसलेला राजकीय खेळ दुसऱ्यांदा यशस्वी करून दाखविला. हे सारे एकाच विधानसभेच्या कार्यकाळात घडले. असे शरद पवारांचे १९७८ चे 'खंजीरकांड' वगळता इतक्या घाऊक प्रमाणात कधी झाले नव्हते. या साऱ्या ट्रॅपिझच्या थरारक खेळाचा खरा न्यायमूर्ती शेवटी मतदार आहे. पक्षांतरबंदी कायदा आणि त्यातले असंख्य बदल यांचे जे मोठे अवडंबर उभे राहिले आहे, ते किती निरर्थक आहे, हे सगळे पक्ष रोजच्या रोज दाखवून देत आहेत. व्यवहारवादी राजकारणाला (रिअलपोलिटिक) नैतिक किंवा न्यायिक वेसण घालण्याला किती मर्यादा असतात, हे शिकविण्यासाठी महाराष्ट्राचे हे उदाहरण पुढे अनेक पिढ्या उपयोगी पडेल!

# भाजपाच्या दडपशाहीला निष्ठावंत शिवसैनिक घाबरणार नाही

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

साडेतीन कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याच्या आरोपावरुन ठाकरे शिवसेनेचे राजापूरचे आमदार र साळवी आणि त्यांच्या कुटूंबियांवर शहर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून ही कारवाई करण्यात आली असून, या विभागाचे उपअधीक्षक अधिक तपास करत आहेत. साळवी यांच्यावर केलेल्या कारवाईवर विरोधकांकडून विविध आरोप करण्यात येत आहेत. ठाकरे गटाने साळवी यांच्यावर केलेल्या कारवाईचा निषेध केला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे निष्ठावंत आमदार साळवी यांच्यावर राजकीय सूडबुद्धीतून केलेल्या कारवाईचा मी धिक्कार करत आहे. कितीही त्रास झाला, तरी ठाकरे यांची साथ सोडणार नाही असे ठणकावून सांगणाऱ्या साळवींबद्दल आम्हाला अभिमान आहे. सर्व निष्ठावंत शिवसैनिकांना जाणीवपूर्वक त्रास देऊन मिंधे गटामध्ये सामील होण्यासाठी अशी कपट कारस्थाने केली जात आहेत, असा आरोप ठाकरे गटाने केला आहे. तसेच अधिकारी आणि सध्याचे सत्ताधारी यांना सांगतो की, राजन साळवी यांच्यासारख्या लाखो निष्ठावंतांच्या सामर्थ्यातूनच उद्याची शिवसेना उभी राहणार आहे. निष्ठावंत शिवसैनिक तुमच्या कोणत्याही दडपशाहीला घाबरणार नाहीत, असं देखील ठाकरे गटाने ठणकावले आहे. कारवाईवर राजन साळवींची प्रतिक्रिया आली आहे. ठाकरे यांच्यासोबत



राहिल्याने आमची चौकशी सुरु झाली आहे. आम्ही कसे आहोत हे जनतेला माहिती आहे. माझ्या पाठिशी माझे मतदार आणि संपूर्ण जिल्हा आहे. हे अधिकारी कालच रत्नागिरीत दाखल झाले होते. मी तुरुंगात गेलो तरी ठाकरे यांची साथ सोडणार नाही, असे साळवी म्हणआले. तसेच चौकशीचे परिणाम काय होऊ द्या, सामोर जाण्याची माझी तयारी आहे. माझ्या पक्षावर पूर्ण विश्वास आहे, असे साळवी म्हणाले. तसेच उद्धव ठाकरेंनी मला तातडीने फोन केला. त्यांनी विचारपूस केली. तुझ्या पाठिशी संपूर्ण महाराष्ट्र आहे. याचा मला अभिमान आहे, असं ाकरे म्हणाले.

# तलाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांची निवड यादी लवकरच

**पुणे । वृत्तसंस्था**

तलाठी परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर केल्यानंतर आता येत्या आठवड्यात जिल्हानिहाय उमेदवारांची निवड यादी जाहीर होणार आहे. जात संवर्गनिहाय तसेच जिल्ह्यातील रिक्त पदांनुसार याद्या तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या २६ जानेवारीला ही नियुक्ती पत्र देण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात येत आहे. तलाठी परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच भूमीअभिलेख विभागाने जाहीर केली. त्यावर परीक्षेत घोटाळा झाल्याचा आरोप स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसह राजकीय संघटनांनी केला होता. दरम्यान, भूमी अभिलेख विभागाने गुणवत्ता यादीनंतर यशस्वी उमेदवारांची यादी तयार करण्याचे काम सुरू केले. ते काम अंतिम टप्प्यात आहे. आदिवासी जिल्ह्यांमधील पेसा अंतर्गत रिक्त जागा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरच भरण्यात येतील, असे यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातून तलाठी परीक्षेसाठी सुमारे आठ लाख ६४ हजार ९६० उमेदवारांनी परीक्षा दिल्या आहेत. अर्जदारांची संख्या मोठी असल्याने तीन टप्प्यात ही परीक्षा घेण्यात आल्या. दिवसातील तीन सत्रांत परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर सहा जानेवारीला गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. 'निवड यादीसाठी जिल्हा निवड मंडळाची मदत घेण्यात येते. या याद्यांमध्ये जिल्ह्यातील रिक्त पदांचा विचार केला जाणार आहे. ही रिक्त पदे भरताना जात संवर्गानुसार यादी तयार करण्यात येत आहे. या याद्या २३ जिल्ह्यातील असून ते तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या आठवडाभरात यशस्वी उमेदवारांची यादी जिल्हास्तरावर जाहीर करण्यात येणार आहे,' अशी माहिती तलाठी परीक्षेच्या राज्य समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त सरिता नरके यांनी दिली. दरम्यान, यशस्वी उमेदवारांना येत्या २६ जानेवारीला नियुक्ती पत्रे देण्याचे नियोजन सुरू आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# भाजपाचा आत्मविश्वास गेल्यानेच ते पक्ष फोडाफोडीचे कटकारस्थान

**सांगली । वृत्तसंस्था**

भाजपचा आत्मविश्वास गेला आहे. त्यांच्याकडे बहुमत आहे तर पक्ष फोडण्याची वेळ का येते ? असा सवाल करत येणारी लोकसभा निवडणूक भाजप विरुध्द जनता अशी होणार असल्याने भाजप ४०० की २०० जागा पार करणार हे जनताच ठरवेल, या शब्दांत काँग्रेसचे विधिमंडळातील गटनेते आमदार पाटील यांनी भाजपच्या 'अब की बार ४०० पार' या घोषणेची हवाच काढून घेतली. कोल्हापुरातील काँग्रेसचे आमदार पाटील, आमदार जयश्री जाधव, आमदार पाटील, आमदार आसगावकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी एकत्रित सत्यशोधक चित्रपट पाहिला. तत्पूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आ. पाटील म्हणाले, भाजपची प्रतिमा चांगली आहे तर केलेल्या कामांवरच त्यांनी निवडणूक लढवली पाहिजे. मात्र, त्यांचा आत्मविश्वास गेल्यानेच ते पक्ष फोडाफोडी करत आहेत. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भाजपने दिलेल्या ऑफरवर पाटील म्हणाले, शिंदे कुटुंबीय गेल्या ५० वर्षांपासून काँग्रेसची एकनिष्ठ आहे. या ऑफरवर सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, भाजपकडून त्यांना टार्गेट केले जात आहे. या गोष्टीचा आम्ही निषेध करतो. काँग्रेस एकसंघ आहे आणि ती पुढेही एकसंघ राहील. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार शेट्टी यांना सोबत घ्या अशा सूचना वारंवार वरिष्ठांना केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याबाबत काही दिवसात चित्र स्पष्ट होईल, असा विश्वास आ.पाटील यांनी व्यक्त केला. शेट्टी यांच्याशी बोलणे होत असून त्यांना महाविकास आघाडी सोबत घेण्यासाठी प्रयत्न सुरूच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मराठवाड्यात १८ हजार प्रमाणपत्र वाटप

**छत्रपती संभाजीनगर**

राज्यात सापडलेल्या ५४ लाख कुणबी नोंदींचे प्रमाणपत्र देण्याची मागणी मनोज जरांगे यांच्याकडून करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर आता सरकारने पाऊल उचलायला सुरुवात केलीय. मराठवाड्यातील ज्या गावांमध्ये कुणबी नोंदी आढळलेल्या आहेत, त्या गावातील सर्व पात्र लोकांची यादी गावस्तरावर लावण्यात आली आहे. गावोगावी दवंडी दिली जात आहे. आतापर्यंत मराठवाड्यात ३२ हजार नोंदी सापडल्या आहेत, त्यातील १८ हजार लोकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत. उर्वरित लोकांनाही लवकरात लवकर हे प्रमाणपत्र मिळावेत यासाठी पुढचे १५ दिवस मराठवाड्यात विशेष मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती मराठवाडा विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड यांनी दिली आहे. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे कुणबी जात प्रमाणपत्र करण्याबाबत शासनाकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार कुणबी नोंदी आढळलेल्या लातूर तालुक्यातील १५ गावांमध्ये कुणबी प्रमाणपत्र वितरणासाठी आज तालुक्यात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर तालुक्यात कासरगाव, खंडाळा, खुलगापूर, खुंटेफळ, कोळपा ममदापूर, मांजरी, मुरुड अकोला, पिंपळगाव अंबा, रामेश्वर, सावरगाव, एकुर्गा, हिसोरी, पिंपरी अंबा व वाडीवाघोली अशा एकूण १५ गावांमध्ये कुणबी जातीच्या नोंदी आढळून आलेल्या आहेत. कुणबी नोंदी धारकांच्या वारसांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र वितरीत करण्याचे काम सद्यःस्थितीत सुरु आहे. आढळून आलेल्या नोंदींवरुन वारस शोधण्यासाठी महसूल विभाग, भूमी अभिलेख विभागातील खासरा पहाणी, पाहणीपत्रक, कुळ रजिष्टर, जुने फेरफार, सातबारा, टिपण, गुणाकार बुक, योजना व सलेवार या अभिलेख्यांच्या आधारे अर्जदारांना मदत होत आहे. लातूर तालुक्यात कासरगाव, खंडाळा, खुलगापूर, खुटेफळ, कोळपा, ममदापूर, मांजरी, मुरुड अकोला, पिंपळगाव अंबा, रामेश्वर, सावरगाव, एकुर्गा, हिसोरी, पिंपरी अंबा व वाडीवाघोली या १५ गावांमध्ये १८ जानेवारी रोजी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये कुणबी नोंदीधारक यांच्या वारसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आणि महाभूमी संकेतस्थळावरून आवश्यक अभिलेखे उपलब्ध करून घ्यावेत. तसेच कुणबी नोंदीधारक यांच्या वारसांनी जास्तीत जास्त प्रमाणात कुणबी जातीच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहेत.

पान १ वरून....

## सरकारला भ्रमात

आंदोलन करणार आहे. फोन आला नाही म्हणून नका, स्वतः होऊन पुढे या आणि आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन जरांगे यांनी मराठा समाजाला केले आहेत. तसेच, राज्यातील संपूर्ण मराठा समाजाच्या आमदार-खासदार यांनी देखील या आंदोलनात सहभागी व्हावेत. अन्यथा यांना लक्षात ठेवा कोण आपला आंदोलनात आले नाही, असे जरांगे म्हणाले आहेत.

## पत्रकारच समाजाचा

भालचंद्र सोळंके, तलाठी गवई,ग्रामसेवक गेंदले यांना प्रदान करण्यात आला. आभार प्रदर्शन माजलगाव एकता पत्रकार संघाचे पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने अमर साळवे,राजेभाऊ पाष्टे, उफाडे ,वसंत परसे, यांनी परिश्रम घेतले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष मुंडे म्हणाले, पत्रकारांनी वंचितांचा आवाज बनावे. सामान्य माणसांची प्रश्न समजून घेत त्यावर पत्रकारांनी आवाज उठवण्याची खरी गरज आहे. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी पत्रकारीता क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारासह माजलगाव तालुक्यातील सामाजिक कार्यात,आरोग्यरुग्ण सेवेमध्ये,उद्योजक, सहकारासह इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्हा आणि माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन गेल्या चार वर्षापासून सन्मानीत करण्यात येते. समाजातील शेवटच्या घटकांची प्रश्न मांडणारा पत्रकारच असतो. सामाजिक आंदोलने उभी करण्याचे सामर्थ्य केवळ पत्रकारांमध्येच असते. पत्रकार हा लोकांचा आवाज असतो, असे प्रतिपादन पत्रकार भागवत तावरे यांनी केले. मूकनायकचे मानकरी संपादक बाबा श्रीहरी देशमाने यांनी मनोगत मांडताना सांगितले, माझे अनेक राज्य, देश पातळीवर अनेक सन्मान झाले मात्र माझ्या मातीतला हा सन्मान माझ्यासाठी खुप मोलाचा आहे.

## कृषीमत्री मुंडेंची

होतं, लाखो रुपये देण्यामागचे. मी ही खंडणी मागते असे मुंडे आरोप करतात मी ५ कोटीच्या घरात राहते अडीच कोटीचे माझावर कर्ज आहे, तसंच माझा सोन्याच्या दागिन्यांवर कर्ज घेतले आहे. मी माझा खात्यावरून मुंडेंना १ कोटी रुपये दिले आहेत. वेळोवेळी मी मुंडेंच्या सांगण्यावरून त्याच्या जवळच्या कार्यकर्तांना पैसे दिले आहेत. मी सध्या सोनं विकून घर चालवत आहे, मी जर एक सीडी चालवली तर महाराष्ट्र हादरेल. धनंजय मुंडे यांनी मी सध्याची पत्नी आणि बहिण याच्या व्यतिरिक्त ३ मुलींना फसवलं आहे. मी ब्लॅकमेलर नाही पण जी पत्नी सध्या त्यांच्यासोबत आहे ती ब्लॅकमेलर आहे. मी जर ब्लॅकमेल करत असती तर मी कर्जबाजारी नसती. या पूर्वी माझे कर्ज धनंजय मुडे त्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांकडून भरतात ते आजही भरत आहे, असा दावाही त्यांनी केला. मी पवार यांनाही पत्र लिहून पाठवलेले आहे. मुंडेंना बोलवून समजा मात्र त्यांनी दुर्लक्ष केले. परळीतील बबन गिते यांनाही अडकवण्यात मुंडेंचा हात आहे. मुंडे केरेक्टर लेस मंत्री आहे. मुंडे यांनी अन्य मुलींचीही अश्लील व्हिडिओ क्लिप बनवल्या आहेत. त्या आधारेच ते त्यांना ब्लॅकमेल करतात. मी आतापर्यंत गप्प होती मात्र आता मी न्यायालयीन लढाई लढणार. माझा मुद्दा विरोधीपक्ष नेतेही उचलून धरत नाही कारण ते एकमेकांना मिळालेले आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

## नागपूरच्या रणांगणात

मोठ्या संख्येने पहायला मिळतात. मात्र रिपब्लिकन पक्ष व बहुजन समाज पक्षात हे मतदार विभागले जात असल्यामुळे निश्चित अशी ताकत नागपुरात पहायला मिळत नाही. नागपूर व विदर्भात कुणबी समाजाचे प्राबल्य आहे. त्यापाठोपाठ तेली, इतर ओबीसी जाती व दलित मतदारांची संख्या लक्षणीय आहे. मराठा समाजाचे अस्तित्व अत्यल्प असल्याने येथे मराठा आरक्षणाचा मुद्दा प्रभावी नाही. मात्र ओबीसी आरक्षणाचे संरक्षण व जातीय जनगणनेची मागणी याठिकाणी प्रामुख्याने पहायला मिळते. गेल्या काळात यासाठी नागपुरात आंदोलन झाल्याचेही पहायला मिळाले. भाजपमधील ओबीसी नेतृत्वाचा या आंदोलनांमध्ये सक्रीय सहभाग असल्यामुळे या आंदोलनांमुळे भाजपला फार नुकसान होण्याची शक्यता कमीच आहे. लोकसभा निवडणूक लढण्यासाठी नागपूर काँग्रेसमध्ये उमेदवाराची वानवा आहे. कुठलाही मोठा नेता गडकरींविरुद्ध निवडणूक लढण्यास उत्सुक नाही. नागपूर पदवीधर मतदाससंघातून प्रतिनिधित्व करणारे अभिजीत वंजारी माजी खासदार विलास मुत्तेमवार यांचे पुत्र मुत्तेमवार , प्रफुल्ल गुडधे यांचे नाव उमेदवारीसाठी चर्चेत आहे. नागपूर काँग्रेसमध्ये कायम गटबाजीचे राजकारण पहायला मिळते. मुत्तेमवार, चतुर्वेदी व राऊत यांच्यात विस्तवही जात नव्हता.. मात्र अलीकडे या तिन्ही नेत्यांचे सूत जुळल्याचे पहायला मिळते. मात्र या तिन्ही नेत्यांची ताकत तुलनेने क्षीण झाल्याने ते फारसे प्रभाव पाडतील याबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांनाच शंका आहे. नागपुरात भाजप विकासाच्या मुद्यावर २०२४ ची निवडणूक लढणार आहे. २०१४ सालानंतर नागपुरात झालेले बदल हा भाजपच्या प्रचाराचा मुख्य मुद्दा असेल. आयआयटी, आयआयएम, एम्स, लॉ स्कूल, सिम्बॉयसीस विद्यापीठ, मिहान प्रकल्पामध्ये वाढलेले रोजगार, उड्डाण पूल, मेट्रो रेल व सिमेंट रस्त्यांचे जाळे ही दृश्य स्वरुपात दिसणारी प्रगती भाजपसाठी जमेची बाजू आहे. गडकरी व फडणविस यांच्या नेतृत्वाच्या भरोश्यावर येत्या निवडणुकीत मताधिक्य वाढवण्यावर भाजपचा भर असेल. नितीन गडकरी यांनी गेल्या १० वर्षात नागपुरात काही रचनात्मक काम केले आहे. राजकारणापलिकडे जाऊन सेवा उपक्रम, सांस्कृतिक व क्रिडा महोत्सव, ज्येष्ठ नागरीक व दिव्यांगांसाठी विविध योजना राबवून सर्वसमावेशकता साधण्याचे प्रयत्न केले आहे. याशिवाय गडकरींनी नागपुरात बेरजेचे राजकारण करण्याचे प्रयत्न केले आहे. पक्ष आणि विचारधारेच्या पलिकडे गडकरींचे सर्व विचारधारेच्या लोकांमध्ये व समाजातील सर्व आयामांमध्ये काम करणारे मित्र आहेत. त्यामुळे निवडणुकीत त्यांना सर्व स्तरातून मदत मिळत आली आहे. यंदा गडकरींची ही शक्ती तोडण्यासाठी सध्या तरी काँग्रेस कडे काही ठोस योजना असल्याचे दिसत नाही.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती पुन्हा खालावली

**मुंबई । वृत्तसंस्था**

कोराना काळानंतर राज्यातील ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती खालवल्यावर पुन्हा एकदा समोर आलंय. विद्यार्थ्यांना सोपी गणितं, मराठी, इंग्रजी वाचनात अडचणी निर्माण होत असल्याचा अहवाल असरने प्रकाशित केलाय. कोरोना काळात विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे ऑनलाइन माध्यमातून दिले जात होते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची लिखाण करण्याची सवय तुटल्याचं पाहायला मिळालं. त्यातच आता कोरोना काळानंतर ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाची गुणवत्ता खालावल्याचं चित्र आहे. दरम्यान देशातील २८ जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये राज्यातील फक्त नांदेड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला होता. या सर्वेक्षणात कोरोना काळात खंड पडला होता. त्यानंतर २०१८ - १९ नंतर यंदाच्या वर्षात म्हणजेच २०२२-२३ या वर्षाचा असर अहवाल जाहीर करण्यात आलाय. प्रथम एज्युकेशन फाउंडेशनने देशभर केलेल्या असर सर्वेक्षणातून शिक्षणाची दैना समोर आलीये. कोरोना काळापूर्वी झालेल्या सर्वेक्षण अहवालाच्या तुलनेत किमान क्षमता विकसित झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ८ ते १० टक्क्यांनी घटले आहे. इतकेच नव्हे तर शाळेतील पायाभूत सुविधांची उपलब्धता देखील कमी झाल्याचं या अहवालातून समोर आलं आहे. या अहवालानुसार साधारणपणे दहा ते बारा साध्या सोप्या वाक्यांचा परिच्छेद दुसरीच्या विद्यार्थ्यांना येणं अपेक्षित आहे. त्यानुसार, एक होती आजी. एकदा तिला तिच्या बहिणीचे पत्र आले. आजीला तिने तिच्या घरी पूजेला बोलावले होते. आजीने आपल्या सामानाचे गाठोडे बांधले. अशा स्वरुपाचा परिच्छेद विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी देण्यात आला होता. मात्र, पाचवीतील साधारण ४४ टक्के आणि आठवीतील २४ टक्के विद्यार्थी तो परिच्छेद वाचू शकले नाहीत. पाचवीच्या विद्यार्थ्यांना दोन अंकी संख्येतून दोन अंकी संख्या वजा करण्यास सांगण्यात आले. मात्र अशा स्वरूपाचे गणित अवघ्या १९.६ टक्के विद्यार्थ्यांना सोडवता आले नाही. आठवीच्या विद्यार्थ्यांना तीन अंकी संख्येस, एक अंकी संख्येने भागण्यास सांगितले. मात्र, अशा स्वरूपाचे गणित सोडवू शकणाऱ्या इयत्ता आठवतील विद्यार्थ्यांचे प्रमाण ४०.७ टक्के वरुन ३४.६ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. What is the time? / This is a large house. / I like to read, अशी वाक्य पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी देण्यात आली होती. ही वाक्य वाचू शकणाऱ्या पाचवीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण २५.५ टक्के आणि आठवीतील विद्यार्थ्यांची प्रमाण ४९.२ टक्के होते. तसेच आठवीतील ५ टक्के विद्यार्थी आणि पाचवीतील १० टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजी कॅपिटल अक्षरेही ओळखता आली नाहीत. यंदा १४ ते १८ वर्षे या वयोगटातील म्हणजे साधारण आठवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी अवगत केलेली भाषिक, गणिती कौशल्ये, त्याचे प्राथमिक पातळीवर उपयोजन अशा बाबींचे १२०० घरांना भेट देऊन सर्वेक्षण करण्यात आले. राज्यात कोरोनापूर्व शैक्षणिक वर्षापूर्वीच्या तुलनेत शाळांमधील पायाभूत सुविधांचे प्रमाणही घटले असल्याचे या अहवालातून समोर आले आहे. या अहवालात सर्वेक्षण करण्यात आलेल्या विविध प्रकारांमधून नापासांचा टक्का काढण्यात आला. यामध्ये इयत्ता पाचवीमध्ये वजाबाकीमध्ये ६८ टक्के, मराठी वाचन ४४ टक्के, इंग्रजी वाचन ७६ टक्के असा नापासांचा टक्का आहे. त्याचप्रमाणे इयत्ता आठवीमध्ये भागाकारामध्ये ८० टक्के, मराठी वाचन २४ टक्के, इंग्रजी वाचन ५१ टक्के असा नापासांचा टक्का आहे. असर अहवालावर केवळ तात्कालिक प्रतिक्रिया देणं चुकीचं असून ठोस उपाययोजना गरजेची असल्याचं मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केलंय. गेल्या काही वर्षापासून ग्रामीण भागातही खासगी शिकवण्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढते आहे. दरम्यान, देशातील फक्त २८ जिल्ह्यांच्याच आधारे हा अहवाल जाहीर करण्यात आलाय. त्यात महाराष्ट्रातील फक्त नांदेड जिल्ह्याचा समावेश आहे. अशात, संपूर्ण राज्याचे मुल्यमापन एकाच जिल्ह्याच्या आधारे योग्य नाही. मात्र, मागील काही वर्षात शैक्षणिक गुणवत्तेचा खालावणारा दर्जा ही सध्या चिंतेची बाब असल्याचं म्हटलं जातंय.

## मराठा समाजाचे सर्वेक्षण, महसूल विभाग कामाला

**मुंबई । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाच्या बाबतीत मोठी बातमी समोर येत असून, २३ जानेवारीपासून मराठा समाजाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने याबाबत माहिती दिली आहे. सर्वेक्षण ३१ जानेवारीपर्यंत संपण्याच्या सूचना देखील राज्य मागासवर्ग आयोगाच्या वतीने देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, महसूल विभागाअंतर्गत मराठा समाजाचे संपूर्णपणे सर्वेक्षण केले जाणार आहे. मराठा समाजाचे सर्वेक्षण आदेश मागासवर्ग आयोगाच्या वतीने देण्यात आले आहेत. या संदर्भात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना २० जानेवारीला जिल्हाधिकार्यालय आणि महानगरपालिका या ठिकाणी प्रशिक्षण दिले जाणार आहेत. त्यानंतर वार्ड व तालुका या ठिकाणी हे अधिकारी २० आणि २१ तारखेला प्रशिक्षण देतील. हे सर्वेक्षण ३१ जानेवारीपर्यंत हे संपण्याचे राज्य मागासवर्ग आयोगाच्या सूचना आहेत. तसेच, हे सर्वेक्षण करत असताना सॉफ्टवेअर कसं वापरायचं या संदर्भात तीन दिवस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिल जाणार आहेत. सर्वेक्षण करण्यासाठी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्त हे नोडल ऑफिसर म्हणून काम करणार असल्याचे देखील आदेशात म्हटले आहेत. याबाबत मागासवर्ग आयोगाच्या वतीने काढण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाकडील १३ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविले आहे. त्याअनुषंगाने राज्यातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण शासकीय यंत्रणेमार्फ़त करण्यात येणार आहे.

## तरूण पिढी नोकरीच्या शोधात

**मुंबई । वृत्तसंस्था**

धकाधकीच्या आयुष्यात तीव्र स्पर्धेला तोंड देत आजची तरुणपिढी विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर, सुरू होत असलेल्या नव्या कंपन्या, नवे उद्योग आणि परदेशातही करिअर घडविण्याचा पर्याय यामुळे निर्माण झालेल्या संधी तरुणांना खुणावत असतात. त्यामुळे आर्थिक प्रगती साधण्यासाठी तरुण अन्य नोकरीकडे वळतात. यंदाही तब्बल ८८ टक्के नोकरदार सध्या करीत असलेली नोकरी सोडण्याच्या विचारात आहेत. लिंक्डइन या पोर्टलच्या वतीने बुधवारी जारी करण्यात आलेल्या एका अहवालातून हे समोर आले आहे. मागील वर्षी हे प्रमाण ४ टक्क्यांनी वाढले आहे. या सर्वेक्षणात २४ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर २०२३ या काळात देशभरातील प्रूणवेळ तसेच अर्धवेळ नोकरी करणाऱ्या १०९७ नोकरदारांची मते जाणून घेतली. यात पुरुष आणि महिला नोकरदारांचाही समावेश आहे. नोकरी शोधण्यासाठी एआय आधारित प्सचा वापर वाढला आहे. शिक्षण, आत्मसात केलेली कौशल्ये आणि अनुभवाच्या आधारे तुम्ही कोणते कंपनी किंवा कोणत्या पदासाठी प्रयत्न करावे, आदींबाबत मार्गदर्शन टॅलेंटप्राइस, पायजामा जॉब्स तसेच फोर्टेसारख्या प्सकडून केले जाते.

# रोजगार हमी योजनेच्या मजुरांना वेतन मिळेना

**नाशिक । वृत्तसंस्था**

रोजगार हमी योजनेतील कामांवर काम करीत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील मजुरांचे आठ कोटी रुपये दोन महिने थकविल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात दिवाळीच्या अखेरच्या टप्यात कशीबशी मजुरी मिळाली होती. त्यानंतर पुन्हा म्हणजे नोव्हेंबर आणि डिसेंबर तसेच अर्ध्या जानेवारी महिन्याची मजुरीदेखील मजुरांना मिळाली नसल्याने या मजुरांची संक्रांतदेखील गोड होऊ शकली नाही. अवघी ७ कोटी ८८ लाखांची ही मजुरांची रक्कम केंद्राकडूनच मिळाली नसल्याने मजुरांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली नाही. रोजगार हमीच्या कामांवर काम करीत असलेल्या मजुरांच्या खात्यात आठवडाभरात रक्कम जमा केली जात असताना केंद्र सरकारने सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्यांमध्ये मजुरांच्या खात्यात रक्कम जमा केलेली नव्हती. त्यामुळे या मजुरांना ऐन सणासुदीच्या काळात उधार, उसनवार करण्याची वेळ आली होती. मजुरांना वर्षातील किमान १०० दिवस रोजगाराची हमी देणारा महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार



हमी योजना कायदा केंद्र सरकारने केला असून, त्यात मजुरांची ऑनलाइन हजेरी घेऊन दर आठवड्याला त्यांच्या का माची रक्कम जमा केली जाते. ही रक्कम केंद्र सरकार थेट जमा करीत असते. रोजगार हमी योजनेच्या मजुरांचे पैसे कधीही थांबवले जात नसल्याने रोजगार हमी योजनेविषयी मजुरांमध्ये एक विश्वास निर्माण झालेला आहे. मागील सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्यांचे रोजगार हमी मजुरांचे पैसे केंद्र सरकारने मजुरांच्या खात्यात वर्ग केले नाही. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात दोन महिन्यांची थकीत मजुरी देण्यात आली होती. तर नोव्हेंबरनंतर पुन्हा आता दोन महिने उलटूनही रक्कम वर्ग नाही. मजुरांना त्यांची मजुरी दर आठवड्याला खात्यात वर्ग करणे शासकीय यंत्रणेला बंधनकारक आहे. त्यात जर कुणी विलंब केला तर आठवडानिहाय विलंबाचा दंड संबंधिताना लावला जातो. मात्र, आता जर तब्बल दोन महिन्यांचा मजुरी विलंब थेट शासनच लावत असेल, तर शासनाला दंड कोण करणार, अशा चर्चेलादेखील बहर आला आहे. रोजगार हमीवर इतर रोजंदारीच्या कामांपेक्षा कमी रक्कम मिळत असते. मात्र, वर्षभर काम तसेच प्रत्येक आठवड्याला मिळणारी मजुरी यामुळे मजूर रोजगार हमीला प्राधान्य देतात. मात्र, आता सलग दुसऱ्यांदा दोन महिन्यांची मजुरीची रक्कम थकल्याने रोजगार हमी योजनेविषयी असलेल्या विश्वासाला तडा जात असून मजूरच मिळेनासे झाले आहेत.

# शेतीच्या नावाखाली गांजाची लागवड कराल तर जेलची हवा

**मुंबई । वृत्तसंस्था**

गेल्या ११ महिन्यांत मुंबई पोलिसांनी ६२९ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत ७७५ गुन्हे नोंदवत ८३४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. विविध शेतीच्या नावाखाली तुम्हीही गांजा शेती केली तर कोठडीची हवा खावी लागणार आहे. मुंबई पोलिसांकडून गेल्या ११ महिन्यांत ड्रग्ज तस्करी प्रकरणी १,३१३ गुन्हे नोंदविण्यात



आले आहेत. या कारवाईत १,६१६ जणांना अटक करण्यात आली आहे. ड्रग्जचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध ९००९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये ९,१३८ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत गांजा प्रकरणी ७७५ सर्वाधिक गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.यापूर्वी एनसीबीने केलेल्या कारवाईत घरातच जमीनविरहित हायड्रोपोनिक गांजाची शेती करणाऱ्या दुकलीला एनसीबीने बेड्या ठोकल्या होत्या. यापूर्वी एनसीबीने केलेल्या कारवाईत घरातच जमीनविरहित हायड्रोपोनिक गांजाची शेती करणाऱ्या दुकलीला एनसीबीने बेड्या ठोकल्या होत्या. डोंबिवलीच्या पलावा सिटीतील रहिवासी इमारतीतील २ बीएचके फ्लॅटमध्ये शेती सुरू होती. यासाठी डार्कवेबद्वारे मस्टरडॅम, नेदरलॅण्ड येथून बियाणे विकत घेण्यात येत होते. अटक करण्यात आलेल्या दुकलीकडून १ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला आहे. याची खरेदी-विक्री बिटकॉइन्सद्वारे करण्यात येत होती. ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी स्नॅपचॅट आणि व्हॉट्सपसारख्या सोशल मीडिया प्सचा आधार घेण्यात आला होता. बाजारात ५० ते १०० रुपयांमध्ये गांजाचे पॅकेट मुलांना मिळत आहे. झोपडपट्टीसह हायप्रोफाइल सोसायटीसह शाळा, कॉलेज परिसराभोवती तस्कर मंडळी घिरट्या घालताना अनेकदा पोलिसांच्या कारवाईत अडकले आहेत.

## पंतप्रधानांचंही वय झालयं -नाना पटोले

**नागपूर । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात उभी फूट पडल्यानंतर अजित पवारांनी शरद पवारांच्या वयावर सातत्याने टीका केली आहे. ज्येष्ठांनी मार्गदर्शन करावे, राजकारणातून निवृत्ती घ्यावी, असे त्यांनी सुरूवातीलाच म्हटले होते. त्यानंतरही अजित पवार शरद पवारांच्या वयावरून अनेकदा बोलले आहेत. याच मुद्द्यावरून आता कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी अजित पवारांवर सडकून टीका केली आहे. वयोमानाच्या मर्यादा भाजपने इतरांसाठी लावल्या आहेत. पण त्यांनी स्वतः पद सोडलेले नाही. अजित पवार यांच्यात जर खरंच हिंमत असेल तर त्यांनी आता पंतप्रधान मोदींना निवृत्त व्हा, असे बोलून दाखवावे. मग बघा त्यांचा ७० हजार कोटीचा भ्रष्टाचार कसा बाहेर येतो, ते कळेल, अशा शब्दात नाना पटोलेंनी अजित पवारांवर टीकास्त्र सोडले आहे. राहुल गांधींची मणिपूरमधून भारत जोडो न्याय यात्रा सुरू होत असताना कॉंग्रेसचा एक नेता शिंदे गटात गेला. अजूनही कॉंग्रेसचे नेते खेचण्याचा प्रयत्न भाजपाकडून होत आहे. त्यांनी ८६ वर्षीय सुशीलकुमार शिंदेंना पक्षात घेण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळे वयोमानाच्या मर्यादा भाजपाने इतरांसाठी लावल्या आहेत. पण त्यांनी स्वतः पद सोडलेले नाही. अजित पवारांनी मोदींचे सुद्धा वय विचारलं पाहिजे. मग त्यांची हिंमत दिसेल. सोशल मीडियावर फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. गिरीश महाजन आणि अजित पवार यांची काय हालत करून ठेवली त्या व्हिडिओत पाहायला मिळत आहे. अजित दादांनी आपल्या काकांचं वय विचारण्यापेक्षा मोदी साहेबांचे वय विचारला पाहिजे, असा टोला देखील नाना पटोलेंनी अजित पवारांना लगावला आहे.

## रामहरी मेंटेंची जय शिवसंग्राम नवी संघटना

**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक दिवगंत विनायक मेटे यांच्या शिवसंग्राम पक्षात फूट पडली असल्याची माहिती समोर येतेय. विनायक मेटे यांचे बंधू रामहरी मेटे यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतलाय. तसेच त्यांनी जय शिवसंग्राम या त्यांच्या नव्या संघटनेची देखील स्थापना करणार असल्याच्या घोषणा केलीये. दरम्यान रामहरी मेटे हे त्यांच्या याच नव्या संघटनेच्या माध्यमातून राजकारणाला सुरुवात करणार आहेत. विनायक मेटे यांच्या निधनानंतर शिवसंग्राम पक्षाची जबाबदारी त्यांच्या पत्नी ज्योती मेटे यांच्याकडे आली होती. मात्र काही दिवसांपासून रामहरी मेटे आणि ज्योती मेटे यांच्यात कौटुंबिक वाद सुरु होते आणि याच वादातून रामहरी मेटे हे पक्षातून बाहेर पडले आहेत. रामहरी मेटे यांनी रायगडावर जाऊन जय शिवसंग्राम या त्यांच्या नव्या संघटनेची स्थापना केली. तसेच महाराष्ट्रातील शिवसंग्राम पक्षातील काही कार्यकर्ते देखील आपल्या सोबत असल्याचा दावा त्यांनी यावेळी केलाय. दरम्यान विनायक मेटे यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचा चंग त्यांच्या समर्थकांनी बांधला असल्याचं यावेळी सांगण्यात आलं. विनायक मेटे यांच्या स्वप्नातील अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणार आहोत. तसेच मराठा आरक्षणासाठी आंदोलनात सक्रीय सहभाग घेऊन ते मिळवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी प्रतिक्रिया रामहरी मेटे यांनी दिली. राम हरी मेटे हे संघटनेचे प्रमुख राहणार असून सुरेश शेटये पाटील यांची संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड जाहीर करण्यात आली. गुरुवार १८ जानेवारी रोजी किल्ले रायगडावर छत्रपतींच्या पुतळयाला आणि जगदीश्वर मंदिरात अभिवादन करण्यात आले. तसचे महाराष्ट्र आणि कर्नाटकातील शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. विनायक मेटे हे शिवसंग्राम पक्षाचे प्रमुख होते. मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनातील मेटे हे महाराष्ट्रातील प्रमुख नेते होते. मराठा आरक्षणासाठी मेटे यांनी अनेकदा आंदोलनं केली. अरबी समुद्रातील शिवस्मारक समितीचे ते अध्यक्ष देखील होते. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील राजेगावचे रहिवासी होते. सर्वप्रथम शिवसेना भाजप युती सरकारच्या काळात आमदार होते. त्यानंतर सलग पाच टर्म विधानपरिषद सदस्य होते.

## जालन्यात स्टील कंपन्यांची झाडाझडती

**जालना । वृत्तसंस्था**

जालन्यातील औद्योगिक वसाहतीतील स्टील कंपन्यांमध्ये गेल्या दोन दिवसापासून केंद्रीय जीएसटी विभागाकडून झाडाझडती सुरू आहे. गुजरातमधून आलेल्या भंगाराची बनावट बिलांच्या आधारे खरेदी केल्याच्या संशयावरून नागपूरच्या पथकाकडून ही झडती घेण्यात आलीय. दोन दिवसात १० ते १२ जणांच्या पथकाकडून ही तपासणी सुरू असून एका कंपनीचे रेकॉर्ड देखील पथकाने जप्त केल्याची माहिती मिळतेय. गुजरातहून बनावट बिलाआधारे पाठवलेले भंगार स्टील कंपन्यांनी घेतल्याने जीएसटीचे पथक तीन दिवसांपासून जालन्यात चौकशीसाठी ठाण मांडून आहे. १० ते १२ उच्चपदस्थ अधिकारी स्टील कंपन्यांची झाडाझडती घेत आहेत. बुधवारी दोन कंपन्यांमध्ये पथकाने छापे टाकले. तर सायंकाळी छत्रपती संभाजीनगर रोडवरील एका कंपनीत भंगाराची वाहने, वजनकाटा सील केला. रात्री उशिरापर्यंत पथकांकडून तपासणी सुरू होती. पथक रविवारी पहाटे ६ वाजेदरम्यान जालना एमआयडीसीत धडकले. संभाजीनगर महामार्गापासून हाकेच्या अंतरावरील एका बड्या स्टील कंपनीत छापा टाकला. पहाटे ६ ते दुसऱ्या दिवशी पहाटे ३ वाजेपर्यंत तब्बल २१ तास ही कारवाई सुरू होती. त्यानंतर पथकाने करमाडजवळील एका हॉटेलमध्ये जेवण करून, सोमवारी दिवसभर विश्रांती घेतली. मंगळवारी पुन्हा जालन्यात येऊन चाचपणी केली. तर बुधवारी रेकॉर्ड जप्त केले. सर्वप्रथम रविवारी ज्या कंपनीत कार्यवाही करण्यात आली त्या कंपनीतील उत्पादन रविवार व सोमवार दोन्ही दिवस बंद ठेवण्यात आले. तर बुधवारीही एकच शिफ्ट चालवण्यात आली. दरम्यान, अधिकारी रेकॉर्ड घेऊन गेलेले असल्यामुळे त्यांच्या तपासणीतून काय बाहेर येते याची उत्सुकता आहे.

# महाराष्ट्राच्या सरकारी अधिकाऱ्यांनी कर्नाटकात येवू नये

**धाराशिव । वृत्तसंस्था**

महाराष्ट्रकर्नाटक सीमावाद गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मात्र बेळगावातकर्नाटक सरकार सातत्याने मराठी बांधवांवर कन्नड सक्ती लादत आहे. त्यातच आता महाराष्ट्राच्या सरकारी अधिकाऱ्यांनी बेळगावात येऊ नये असा इशारा कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिला आहे. बेळगावसह सीमाभागात महाराष्ट्र सरकारकडून मराठी बांधवांसाठी योजना आणल्या आहेत. त्यासाठी सरकारी अधिकारी या गावांमध्ये महाराष्ट्राच्या योजना राबवतात. त्यावरून आता नवा वाद निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले की, महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या ८६५ गावांमध्ये महाराष्ट्र सरकारनं महात्मा फुले जनआरोग्य योजना लागू करण्याचं जाहीर केलंय. मात्र कर्नाटक सरकारनं महाराष्ट्राच्या अधिकाऱ्यांना आमच्या सीमेत येऊ नये असं बजावलं असून आमच्या सचिवांनी महाराष्ट्र सरकारच्या सचिवांशी बोलणं केलंय. महाराष्ट्र सरकारच्या हालचालींवर आम्ही लक्ष ठेऊन आहोत. महाराष्ट्राने कर्नाटकात हस्तक्षेप करू नये असं त्यांनी सांगितले आहे. बेळगाव जिल्ह्यातील बैलहोंगला तालुक्यातील एका सैनिकी शाळेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कर्नाटकात सर्वत्र कन्नड भाषेची सक्ती केली जात असून कन्नडमध्ये शिक्षण घेणाऱ्यांना शाळेत राखीव जागा ठेवण्यात आल्यात. त्यात संगोळी रायण्णा सैनिक शाळेत कन्नड विद्यार्थ्यांसाठी ६५ टक्के तर इतरांसाठी ३५ टक्के जागा राखीव ठेवण्यात आलीय. दर्जेदार शिक्षणासोबत मुलांमध्ये देशभक्ती रुजवली जाईल. त्यामुळे येथे शिकणाऱ्यांना सैन्यात भरतीची संधी मिळेल. म्हणून कन्नड विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जात असल्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षापासून बेळगाव, कारवार, निपाणीसह अनेक भागावर महाराष्ट्र दावा करत आहे. ही गावे महाराष्ट्रात समावेश करण्याची मागणी स्थानिक मराठी लोकांकडून होत आहे. परंतु कर्नाटक सरकारचा याला विरोध आहे. भाषावार राज्य रचनेच्या आधारे १९५७ मध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक ही २ राज्ये झाली. त्यात मराठी बहुल ८०० गावे कर्नाटकात टाकली गेली. तेव्हापासून महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये हा सीमावाद सुरू आहे.

# नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्रे वितरित करा






**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील गाव निहाय कुणबी नोंद सापडलेल्या मराठा बांधवांना नोंदी आधारे योग्य ती वंशावळ तपासणी करून कुणबी प्रमाणपत्र तात्काळ वितरित करावेत. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केली आहे.केज तालुक्यातील अनेक गावात शासकीय दप्तरी मराठा कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या नोंदी आधारे संबंधित पूर्वजांच्या पुढील नातेवाईकांना वंशावळीची पडताळणी करून केज तालुका प्रशासनाने ऑनलाइन प्रमाणपत्र तात्काळ वितरित करावेत. अनेक गावात सापडलेल्या नोंदीमध्ये पणजोबाची नोंद आहे मात्र पुढे पंजोबा व आजोबा यांच्या वडील – मुलगा नात्याचे दस्तावेज उपलब्ध नाहीत. या काळात भूमिहीन लोकांच्या नोंदी शोधणे कठीण जात आहे. यासाठी शासनाने आवश्यक तेथे शपथपत्राचा किंवा 'नोटरी' दस्तावेजद्वारे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. ही समस्या पूर्वजांच्या नोंदी सापडलेल्या अनेक वारसदाराला उद्भवू लागली आहे. यासाठी केज तालुक्यात ज्या गावातील मराठा कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्या पूर्वजांच्या पुढील वंशावळीतील प्रमुख परिवार सदस्याने तालुका प्रशासनाकडे रीतसर महा – ई पोर्टलवर नोंदणी करून प्रमाणपत्र हस्तगत करावेत. शासनाने राज्यातील सर्व तालुका प्रशासनाला याबद्दल आवश्यक आदेश दिले आहेत. तर केज तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने यासाठी मदतकेंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती हनुमंत भोसले यांनी केली आहे.

## जुगार अड्ड्यावर एसपींच्या पथकाचा छापा



**गेवराई । प्रतिनिधी**

येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस अधिक्षक पथक प्रमुख असलेल्या सपोनि गणेश मुंडे व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी गढी पुलाजवळील पत्र्याच्या शेडमध्ये धाड मारत चार जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत ५१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधिक्षक यांच्या पथकाच्या कारवाया जिल्हाभरात सुरु असतात. आज गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या गढी उडान पुलाजवळ एका पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती गणेश मुंडे यांना मिळाली होती. त्यानुसार येथे छापा मारून चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी सुनील नारायण धोतरे, सोमेश्वर बाबू माने, प्रदीप बाजीराव मनोहर, प्रल्हाद बापूराव देवकतेसह मटका बुक्की घेत असलेल्या राहुल खंडागळेवर गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## आष्टी उपबाजार समितीत आ.सुरेश धस यांच्या हस्ते कांदा खरेदीला शुभारंभ





**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा कृषी उत्पन्न बाजार समिती उपबाजारपेठ आष्टी येथे कांदा खरेदीचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते आज शुक्रवार दि.१९ जानेवारी रोजी उद्घाटन होणार असून या उद्घाटन प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांनी केले आहे. आष्टी आणि आष्टी परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची कांदा बाजारपेठीची अडचण समजून आमदार सुरेश धस यांच्या आदेशाने आष्टी उपबाजार समिती येथे ही कांदा खरेदी केंद्राला आज सुरुवात होत असल्याने शेतकऱ्यांचा नक्कीच फायदा होणार असून कडा बाजार पेठे प्रमाणे याही बाजार पेठेत कांदाला दर मिळणार असून आष्टी परिसरातील शेतकऱ्यांनी या बाजारपेठेत कांदा आवक वाढवावी तसेच शेतकऱ्यांनी दि. १९ जानेवारी रोजी होणाऱ्या कांदा खरेदीच्या उद्घाटन प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सभापती यांनी केले आहे.

## आष्टी तालुक्यात पुन्हा बिबट्याची मुक्तसंचार



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील देवळाली येथील शेतकऱ्यांना बिबट्याचे नेहमीच दर्शन होत असते. अशात काही ठिकाणी बिबट्याने शेळ्यांचा फडशा पाडल्याच्या घटनाही उघडकीस आल्या आहेत. तालुक्यात बिबट्याचा मुक्तसंचार होत असून, देवळाली येथील कटके यांच्या शेतात सायंकाळी बिबट्या आढळून आला. त्यामुळे शेतकऱ्यांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे. देवळाली शिवारात मंगळवारी सायंकाळी कटके यांच्या शेतात झुडपात बिबट्या दिसून आला.आपल्या घराकडे जात असताना किरण कटके हे आपल्या वाहनातून जात असताना तत्काळ वाहन थांबवले. त्यानंतर बिबट्या हळूच झुडपातून बाहेर आला आणि रस्ताओलांडून गेला. यावेळी वाहनातील तरुणांनी बिबट्याचा फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केला. आष्टी तालुक्यात देवळाली मोठ्या प्रमाणावर जंगल असल्याने येथे बिबट्याचे वास्तव असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येते. तालुक्यात काही दिवसांपूर्वी बिबट्याने शेळ्यांचा फडशा पाडल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.

## दिवाणी न्यायालयाचा जमीनीबाबत महत्वपूर्ण निकाल



**बीड । प्रतिनिधी**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांच्या न्यायालयात रे. दि. दा. क. ५४/२०२३ मधील वादींनी मौजे सनगाव ता. अंबाजोगाई येथील जमीन सर्व्हे नं./ गट नं. ३६ मधील २ हेक्टर २८ आर शेत जमीन वादग्रस्त दर्शवून सदर दाव्यातील एकुण १४ प्रतिवादींविरूध्द सदर दाव्यातील वादग्रस्त मिळकतीबाबत प्रतिवादी क. १ ते ४ यांनी पद्माकर बळवंतराव देशपांडे यांचे हक्कात वादग्रस्त मिळकतीसमवेत अन्य जमीन मिळकती म्हणजे एकुण ३ हेक्टर ६५ आर जमीनीबाबत करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखत क. ४३६९/२०११, सदर पद्माकर बळवंतराव देशपांडे यांचे वारस प्रतिवादी क. ५ ते ९ यांनी प्रतिवादी क. १० ते १४ यांचे हक्कात करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखते अनुक्रमे कमांक ५५६७/२०२२ क्षेत्रफळ २० आर, ५५६६/२०२२ क्षेत्रफळ १ हेक्टर ३२ आर, ५५६८/२०२२ क्षेत्रफळ ७० आर, ५५७०/२०२२ क्षेत्रफळ १ हेक्टर २३ आर व ५५९४/२०२२ क्षेत्रफळ २० आर ही खरेदीखते बेकायदेशीर असल्याचे घोषित करून वादींवर मुळीच बंधनकारक नसल्याचे घोषित करणेबाबत व सदर दाव्यातील वादग्रस्त मिळकतीबाबत निरंतर मनाई हुकूम मिळणे कामी सदरचा दावा दिनांक ०९/०२/२०२३ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर दाव्यात प्रतिवादी क. १० व १३ यांनी निशाणी क. २५ अन्वये वादींचा दावा नामंजूर करणे बाबत ऑर्डर ७ रूल ११ सी.पी. सी अन्वये अर्ज दिला. त्यावर वादींच्या वतीने लेखी म्हणणे सादर झाले. अंतिमतः प्रतिवादी क्र. १० ते १४ यांच्या वतीने विधिज्ञांनी सादर केलेला वस्तुस्थिती व कायदेशीर मुद्यांवरील युक्तीवाद व त्यामध्ये प्रतिवादी क. १० ते १४ यांच्या विधीज्ञांच्यावतीने सादर करण्यात आलेल्या वरिष्ठ न्यायालयांच्या न्यायनिवाड्या आधारे दिवाणी न्यायाधीश झेड.झेड. खान यांनी प्रतिवादी क. १० व १३ यांचा निशाणी क. २५ वरील अर्ज दिनांक ०८/०१/२०२४ रोजी मंजूर करून वादींचा दावा नामंजूर केला. त्यामुळे वर नमुद दिवाणी दाव्याचा निर्णय एक वर्षाच्या आत आल्याने सदर दाव्यातील प्रतिवादींना एक वर्षाच्या आत न्याय मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रतिवादी क. १० ते १४ यांच्या वतीने ॲड. डिघोळे यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. त्यांना ॲड. मुंडे, ॲड. राख, ॲड. शिवाजी कांबळे, ॲड. चाटे यांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

## विद्यापीठात प्रेम कुलकर्णी यांना ब्रांझ मेडल

**बीड । प्रतिनिधी**

प्रेम कुलकर्णी हे योगेश्वरी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर आपण वेगळा मार्ग निवडून म्हणून इंजिनिअरिंग डी वाय पाटील पुणे येथे कोल्ड टेक्नॉलॉजी अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयातून शिक्षण घेतले व येणाऱ्या काळात सायबर सिक्युरिटी हे जगासमोर आव्हान होणार आहे . हे काळाचे पावले ओळखून हा नवीन विषय घेतला. यामध्ये जिद्द, चिकाटी आणि प्रचंड आत्मविश्वास हा संस्कार त्याला एनसीसी मध्ये असताना मिळाला म्हणून आज मोठ्या प्रमाणावर सायबर अटॅक, सायबर जागृती करणे व देशातील जनतेला सायबर ज्ञान देण्यासाठी या विषयांमध्ये त्यांनी कठोर मेहनत घेतली व त्या विषयात त्यांनी प्राविण्य मिळवले. नुकतेच त्यांचे निकाल लागले. तेव्हा डी वाय पाटील विद्यापीठातून त्यांना सायबर सिक्युरिटी मध्ये विद्यापीठात ब्रांझ मेडल मिळाले. त्यांनी आत्तापर्यंत जवळपास १८०० च्या वर सायबर सिक्युरिटी वर व्याख्याने दिली व समाजामध्ये जनजागृती केली व पुढेही जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करणार व आपले ज्ञान जे घेतले ते सर्वसामान्यांच्या कमी यावे. यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे मत व्यक्त केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सुरेश खुरसाळे, सचिव व्याज गुरुजी, कोषाध्यक्ष प्रा. लोमटे, प्रा. गोळेगावकर, कुलकर्णी, कल्याण कुलकर्णी, सुमंत वेदालंकार,वशिष्ठ यादव, छत्रगुण यादव, चौसाळकर यांनी त्यांच्या अभिनंदन केले.

## जिल्हा परिषद शाळेत आरोग्य अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांची तपासणी



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील तांबवा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियान अंतर्गत उपजिल्हा रुग्णालयाचे वरिष्ठ दंतशल्य चिकित्सक डॉ. रमण दळवी व समुपदेशक यांनी जाऊन दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांची मौखिक तपासणी केली. यावेळी डॉ. दळवी म्हणाले की, लहान मुलांना गोड चॉकलेट, बिस्किटे, जंक फूड, फास्ट फूड असे पदार्थ सेवन करण्याची सवय असते. अशा पदार्थांच्या नियमित सेवनाने दात किडतात, त्याने वेगवेगळे त्रास निर्माण होतात. मुलांमध्ये वेदना वाढतात. त्यामुळे दातांची काळजी घेणे आवश्यक आहे. दाताचे आरोग्य चांगले राहण्यासाठी नियमित सकाळी व रात्री दोन वेळा ब्रश करणे फार गरजेचे असते. पक्क्या दातांसोबतच दुधाच्या दातावर देखील उपचार करुन घेणे हे देखील महत्वाचे आहे असल्याचे ही ते म्हणाले. समुपदेशक यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन आरोग्य व आहार याबद्दल सविस्तर मार्गदर्शन यांनी केले. यावेळी गरजू विद्यार्थ्यांची पीट अँड फिशर ट्रीटमेंट देखील शाळेतच करण्यात आली. अशा प्रकारच्या शिबिरांच्या आयोजनामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक समाधान व्यक्त करत आहेत.